<u>**नियमीत दिवाणी दावा क्र. ७३/२०१४ मधील निशाणी क्र.८१ कडील अर्जावर आदेश.**</u>

१) प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १५ ते २२ तर्फे त्यांच्याविरुध्द निशाणी क्र. १ वर दिनांक ११/०३/२०२२ व दिनांक ०८/०६/२०२२ रोजी पारीत करण्यात आलेला पुरावा बंदचा आदेश रद्द करुन प्रस्तुत प्रकरणात पुढील पुरावा देण्यास परवानगी मिळण्याकरीता दाखल केला आहे.

२) वादीतर्फे प्रस्तुत अर्जास दाखल केलेल्या म्हणण्यामध्ये असे कथन केले आहे की, प्रतिवादी क्र. १५ याने अर्जातील मजकुरास अनुसरुन कोणतेही वैद्यकीय प्रमाणपत्र दाखल केले नाही. प्रतिवादी क्र. १५ याने विनाकारण उशीराने अर्ज दाखल केला आहे व त्यामुळे अर्ज ५,०००/– रुपये खर्च लावुन खारीज करावा.

३) प्रस्तुत अर्जाच्या युक्तिवादाकामी प्रतिवादी क्र. १५ ते २२ यांना व त्यांच्या विद्वान वकीलांना पुकारले असता गैरहजर असल्याने प्रस्तुत अर्जावर प्रतिवादी क्र. १५ ते २२ तर्फे युक्तीवाद नाही असा आदेश पारीत केला आहे. वादीतर्फे विद्वान वकील श्री जी. बी. दुर्गे यांचा युक्तिवाद ऐकला. रोजनाम्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले.

४) वादीच्या विद्वान वकीलांचा युक्तिवाद ऐकला असता व रोजनाम्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन करता असे दिसून येते की, प्रस्तुत प्रकरणामध्ये प्रतिवादी क्र. १५ हा उलटतपासाकरीता हजर राहीला नसल्याने प्रतिवादी क्र. १५ चा पुरावा बंद करण्यात आल्याबाबत निशाणी क्र. १ वर

दिनांक ११/०३/२०२२ रोजी आदेश पारीत केला आहे. तसेच प्रतिवादी क्र. १६ ते २२ यांनी या कामी त्यांचा पुरावा सादर न केल्याने प्रतिवादी क्र. १६ ते २२ यांचा पुरावा बंद करण्यात आल्याबाबत निशाणी क्र. १ वर दिनांक ०८/०६/२०२२ रोजी आदेश पारीत केला आहे. माझ्या मते प्रतिवादी क्र. १५ यांना उलटतपासास सामोरे जाण्याची संधी देवुन व प्रतिवादी क्र. १५ ते २२ यांना त्यांचा पुढील पुरावा सादर करण्याची संधी देऊन प्रस्तुत प्रकरण गुणवत्तेच्या आधारे निकाली काढणे न्यायाचे व उचित आहे. त्यामुळे वरील नमूद कारणांमुळे माझ्या मते न्यायाच्या दृष्टीने प्रस्तुत अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब हे न्यायालय न्यायाच्या दृष्टीने खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात येतो व त्यानुसार निशाणी क्र. ०१ वर दिनांक ११/०३/२०२२ रोजी प्रतिवादी क्र. १५ विरुध्द व निशाणी क्र. १ वर दिनांक ०८/०६/२०२२ रोजी प्रतिवादी क्र. १६ ते २२ यांच्याविरुध्द पारीत केलेला पुरावा बंदचा आदेश रद्द करण्यात येतो.

२. वरीलप्रमाणे न्यायालयात आदेशाचे कथन करुन घोषीत करण्यात आला.

Digitally signed by PANDURANG LIMBAJI GHULE
Date: 2022.10.19 17:14:08 +0530

(पां.लिं. घुले)

दिनांक– १९/१०/२०२२ दिवाणी न्यायाधीश,व. स्तर,दारव्हा

J.O.CODE MH-00497